नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/१०/२०२६ (गुरूवार )**

---

## खुन करून पुरावा नष्ट करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली आजन्म कारावासाची शिक्षा

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक ०४/१२/२०१८ रोजी पोलीस स्टेशन अरोली येथे अप. क्र. २२७/२०१८ कलम ३०२, २०१, ३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, फिर्यादी नारायण लक्ष्मण डहाके, रा. काटोल नागपूर हे दिनांक २८/११/२०१८ रोजी त्यांची बहीण आणि भाच्याला भेटण्याकरीता नागपूर येथे गेले असता त्यांना त्यांची बहीण सौ. लता अनिरूद्ध बावणे,वय ३५ वर्षे व भाचा धिरज अनिरूद्ध बावणे, वय १८ वर्षे हे दिनांक २७/११/२०१८ पासुन घरी नसल्याचे माहिती पडले. फोनवरून संपर्क केला असता फोन बंद होता. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांचे जावई अनिरूद्ध सुखदेव बावने यांना फोन करून विचारले असता त्यांनी बनवाबनवीचे उत्तर दिले. फिर्यादीची बहीण आणि भाचा याचा शोध सुरू असतांना फिर्यादीला माहीती मिळाली की, त्यांचे जावई आरोपी अनिरूद्ध सुखदेव बावने, वय ४० वर्षे, रा खात, ता. मौदा यांनी फिर्यादीची बहीण मृतक नामे सौ. लता अनिरूद्ध बावणे, आणि भाचा मृतक नामे धिरज अनिरूद्ध बावणे यांना स्वत:च्या शेतात नेवुन पैशाचे कारणावरून कोणत्यातरी जड वस्तुने डोक्यावर मारून खुन केला आणि शेतात खड्डा खोदुन दोन्ही प्रेत पुरून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. सदर प्रकरणी वर प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

**तपासी अधिकारी श्रीमती नयन अलुरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक तसेच प्रथम तपासी अधिकारी सहा पोलीस निरीक्षक श्री अजाबराव नेवारे यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला. श्रीमती नयन अलुरकर यांनी आरोपीतांविरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले होते. दिनांक ०८/१०/२०२६ रोजी मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायधीश श्री पी.जे. मोडक यांनी नमुद आरोपी अनिरूद्ध सुखदेव बावने, वय**

**४० वर्षे, रा खात, ता. मौदा यास कलम ३०२ भादंवि अन्वये आजन्म कारावास व ५०००/— दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास, तसेच कलम २०१ भादंवि अन्वये ७ वर्ष सश्रम कारावास व २५००/— दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री एम.एस. कमलाकर यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री रमेश बरकते उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री सागर गोमासे, प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन अरोली, सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, सहा फौजदार श्री मनोज तिवारी, ब.नं १६४१, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण आणि कोर्ट कामात पैरवी पोलीस अंमलदार शिलन वाघमारे, ब. नं १८१८ पोलीस स्टेशन अरोली यांनी मदत करून महत्वपुर्ण योगदान दिले.

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ११ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०८/१०/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी माथनी वाय—पॉईट येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान पिकअप वाहन क्र. एम एच—४०/डी सी—१८१० येताना दिसली.पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ११ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून पिकअप वाहन क्र. एम एच—४०/डी सी—१८१० किंमती ५,००,०००/— रूपये आणि ११ गोवंश जनावरे किंमती १,१०,०००/— रूपये असा एकुण ६,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद प्रकरणी पिकअप वाहन क्र. एम**

**एच–४०/डी सी–१८१० चा चालक आणि मालक याच्या विरूध्द कलम २८१ भां.न्या.सं. सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम ११(१), (ड) प्राण्यांचा छळ अधिनियम , सहकलम १८४ मोटर वाहन कायदयाअन्वये गुन्हा नोंद केला आहे.**



**सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम**

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** येथे पोलीस निरीक्षक श्री. रणजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांनी **श्री सती अनुसया माता हॉल,** पारडसिंगा येथे तसेच **नबिरा विदयालय ,काटोल** येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतले.

**श्री सती अनुसया माता हॉल, पारडसिंगा येथे सुमारे** ८०० **जनसमुदाय उपस्थित होता. तसेच नबिरा विदयालय येथे सुमारे २५० विदयार्थी** व **शिक्षकवृंद उपस्थित होते**. पोलीस निरीक्षक श्री. रणजित शिरसाठ यांनी उपस्थितांना सायबर फसवणुकी बाबत सविस्तर माहीती देवुन त्याबाबतचे व्हिडीओ दाखविले. **सदर कार्यक्रमामध्ये सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट**

सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक , तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा **cybercrime.gov.in** या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडुन करण्यात आले आहे.







# अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान :–** दिनांक ०७/१०/२०२६ रोजी कन्हान पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी नामे **लंकेश इंशु कोडवते, वय २१ वर्ष, रा. गोरेघाट, पो.स्ट कटंगी, ता. तिरोडी, जिल्हा बालाघाट मध्यप्रदेश** हा वार्ड क्र. १, कांन्द्री नगरपंचायत जवळ कन्हान येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरतांना मिळुन आला. तसेच पोस्टे उमरेड अंतर्गत आरोपी **१) ऋषी गोविदा चौधरी, वय ३९ वर्ष, रा. कावारापेठ, ता. उमरेड हा मौजा रेल्वे पुलीयाचे खाली कुही उमरेड रोड येथे** २) **विजय बळीराम खवास, वय ४८ वर्ष, रा. कावारापेठ, ता. उमरेड** हा मौजा रेल्वे सिग्नलचे बिल्डींग जवळ कुही उमरेड येथे सुर्योदयाच्या पुर्वी गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरतांना मिळुन आले. त्यांना त्यांचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हे गुन्हा करण्याचे उद्देशाने संशयीतरित्या वावरतांना मिळुन आल्याने आरोपींचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन पारशिवनी :–** दिनांक ०७/१०/२०२६ रोजी पारशिवनी पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा पारशिवनी जुना बस स्टॉप चौक परीसर येथे एक इसम हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता मौजा पारशिवनी जुना बस स्टॉप चौक परीसर येथे आरोपी नामे शफी सत्तार छवारे, वय ६४ वर्ष, रा. प्रभाग क्र. ०१, कुंभार मोहल्ला पारशिवनी, जि. नागपुर हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम ६२०/– रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य ,एक मोबाईल असा एकुण १६२५/– रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी शफी सत्तार छवारे, वय ६४ वर्ष, रा. प्रभाग क्र. ०१, कुंभार मोहल्ला पारशिवनी, जि. नागपुर याच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०५ गुन्हे दाखल,

**दिनांक ०७/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०५ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे १) पंडीत गणपत बमनोटे वय ७० वर्ष धंदा— रोजमजुरी, रा. वार्ड क्र. ०१ बेलदारपुरा केळवद ता. सावनेर, जि. नागपुर २) चैतराम अमृत जोगी, वय ५७ वर्ष रा. वार्ड क्र. ०४ केळवद, ता. सावनेर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे प्रशांत रामकृष्ण रेंगे, वय ४८ वर्ष, रा. जलालखेडा पुर्नवसन, ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे कमल रामकिशोर पांडे, वय ५० वर्ष, रा. जामु उत्तप्रदेश ह. मु सुरज धाबा आसोला याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ५८५० मिली देशी दारू असा एकुण २६००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर